ePaper
| वर्ष - 9 | अंक -134 | UDYAM-MH-26-0158827 |

## बंडखोर उमेदवारासह अधिकृत उमेदवारही भाजपमध्ये, उद्धव ठाकरे यांना झटका



महाईन्यूज ™

### आतील पानांत

- मुस्तफिझूरला भरपाईची शक्यता कमी
- न्यूझीलंडविरुद्ध रोहित सज्ज!
- "हिंमत असेल तर मला पकडा"
- पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 7 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### शिंदेसेनेला मोठा धक्का

### पंतप्रधान मोदींच्या 'काँग्रेसमुक्त भारत'ला मूठमाती

# भाजपची काँग्रेसशी युती!

## अंबरनाथ नगरपरिषदेत सर्वाधिक जागा जिंकूनही शिंदेसेना सत्तेबाहेर

| ठाणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेत घडलेल्या राजकीय उलथापालथीने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यात भाजपने थेट काँग्रेसशी हातमिळवणी करत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेत शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याचा निर्णायक डाव टाकला आहे. विशेष म्हणजे अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकूनही शिंदेसेनेला सत्तेपासून दूर राहावं लागणार असल्याचं स्पष्ट होत आहे.**



### देशातील सर्वात मोठी राजकीय घडामोड

अंबरनाथ नगरपरिषदेवर भाजपने झेंडा फडकला होता. याठिकाणी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. याठिकाणी शिवसेना शिंदे गटाकडून मनिषा वाळेकर आणि भाजपकडून तेजश्री करंजुले पाटील यांच्यामध्ये नगराध्यक्षपदासाठी चुरशीची लढत झाली. या निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुले या विजयी झाल्या होत्या. या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष भाजपाचा झाला असला तरी देखील याठिकाणी सर्वाधिक नगरसेवकपदाचे उमेदवार शिवसेनेचे विजयी झाले आहेत. नगराध्यक्षपद आणि नगरसेवकांच्या 59 जागांसाठी याठिकाणी निवडणूक पार पडली होती. शिवसेना शिंदे गटाने 23 जागांवर विजय मिळवला. तर भाजपने 16 जागा, काँग्रेस 12 जागा आणि अजित पवाराच्या राष्ट्रवादीने 4 जागांवर विजय मिळाला होता.

- **मोदींच्या 'काँग्रेसमुक्त भारत' घोषणेला छेद**
- **अंबरनाथ नगरपरिषदेत भाजप, काँग्रेस आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची युती**
- **शिंदेसेनेत तीव्र नाराजी | भाजपकडून '२५ वर्षांच्या भ्रष्टाचाराचा' आरोप**

गेल्या महिन्यात पार पडलेल्या अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत शिंदेसेनेनं सर्वाधिक २३ जागा पटकावत आपली ताकद दाखवून दिली होती. भाजप दुसऱ्या क्रमांकावर १६ जागांसह राहिला, तर काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ उमेदवार निवडून आले. कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालं नसतानाच, भाजपने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने बहुमताचा आकडा सहज गाठला. या राजकीय गणितामुळे शिंदेसेना सत्तेपासून दूर फेकली गेली. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुले विजयी झाल्या. एकीकडे नगराध्यक्षपद हातातून गेलं आणि दुसरीकडे सत्तास्थापनेपासूनही दूर राहण्याची वेळ आल्यामुळे शिंदेसेनेत तीव्र असंतोषाचं वातावरण आहे. विशेषतः ठाण्यात भाजप आणि काँग्रेसची युती झाल्याने 'काँग्रेसमुक्त भारत' या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या घोषणेलाच मूठमाती मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या घडामोडींवर शिंदेसेनेनं जोरदार टीका केली आहे. अंबरनाथचे शिंदेसेनेचे आमदार बालाजी किणीकर यांनी भाजप-काँग्रेस-राष्ट्रवादी युतीवर टीकेची झोड उठवली. "स्वार्थासाठी आणि सत्तेसाठी भाजपनं काँग्रेससोबत हातमिळवणी केली आहे. एकीकडे काँग्रेसमुक्त भारतचा नारा द्यायचा आणि दुसरीकडे त्याच काँग्रेसच्या मदतीनं सत्ता मिळवायची, हा दुटप्पीपणा आहे," असा थेट आरोप त्यांनी केला. ही युती 'अभद्र' असल्याचं म्हणत किणीकर यांनी भाजपवर निशाणा साधला. शिंदेसेनेच्या नेत्यांनी भाजपवर आरोप करताना असंही नमूद केलं की, जनतेनं सर्वाधिक जागा देऊनही शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवणं म्हणजे लोकशाही मूल्यांची पायमल्ली आहे. अंबरनाथच्या जनतेनं दिलेल्या कौलाचा अपमान भाजपनं केला असून, ही युती केवळ सत्तालालसेपोटी करण्यात आली आहे, असा आरोप शिंदेसेनेकडून केला जात आहे. दरम्यान, शिंदेसेनेच्या आरोपांना भाजपकडूनही तितकंच आक्रमक प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. भाजपचे उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले पाटील यांनी शिंदेसेनेवर जोरदार पलटवार करताना, "गेल्या २५ वर्षांपासून नगरपरिषदेत भ्रष्टाचार केलेल्या शिंदे गटासोबत सत्तेत बसलो असतो, तर ती खरी अभद्र युती ठरली असती," असं स्पष्ट केलं. भाजपनं सत्तेसाठी नव्हे, तर अंबरनाथच्या विकासासाठी निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला. पाटील यांनी पुढे सांगितलं की, "आम्ही शिंदेसेनेसोबत अनेक वेळा चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पर्याय म्हणून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्याचा निर्णय घ्यावा लागला." भाजपनं घेतलेला हा निर्णय पूर्णपणे व्यावहारिक आणि विकासाभिमुख असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं. या राजकीय घडामोडींमुळे ठाणे जिल्ह्यातील राजकारणात नवी समीकरणं तयार होताना दिसत आहेत. एकीकडे राज्यात महायुतीचा भाग असलेले पक्ष स्थानिक पातळीवर एकमेकांच्या विरोधात उभे ठाकत असल्याचं चित्र आहे.

## अजित पवारांचा पुणे पॅटर्न
### अजित पवार यांनी विजयासाठी दिला ‘अनोखा’ कानमंत्र

# फॉर्म्युला वापरा अन् विजयी व्हा!

## भाजपच्या बालेकिल्ल्यात सुरुंग

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. येत्या 15 तारखेला मतदान होणार असून 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल हाती येणार आहे. त्यांच्या प्रचाराचा धुराळा उडाला आहे. सर्वच प्रमुख नेते मैदानात उतरले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे दौऱ्यावर आले असून त्यांनी उमेदवारांना विजयासाठी खास कानमंत्र दिला आहे.**



पुणे महापालिका निवडणुकीच्या (PMC ELECTION 2026) रणधुमाळीत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) मोठी झेप घेतली आहे. “केवळ उमेदवार म्हणून मिरवू नका, तर प्रत्येक घराचा सदस्य बना,” अशा कडक शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नगरसेवक पदाच्या इच्छुकांना आणि उमेदवारांना विशेष मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी काही ‘अनोखे’ आणि ‘प्रॅक्टिकल’ फंडे कार्यकर्त्यांना दिले.अजित पवारांनी स्पष्ट केले की, निवडणूक ही मोठ्या सभांनी नाही तर ‘बूथ’वरच्या नियोजनाने जिंकली जाते. प्रत्येक उमेदवाराने आपल्या प्रभागातील प्रत्येक बूथसाठी १० विश्वासू कार्यकर्त्यांची ‘अजित रक्षक’ टीम तयार करावी, जी मतदानादिवशी शेवटच्या मतदाराला बाहेर काढेल.“नुसते फोटो टाकू नका,” असे म्हणत पवारांनी कार्यकर्त्यांना सुनावले. “प्रत्येक प्रभागातील व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामील व्हा. लोकांच्या वैयक्तिक अडचणींना डिजिटल माध्यमातून उत्तर द्या. सोशल मीडियावर आपल्या कामाचे ‘इम्पॅक्ट रिल्स’ बनवा, जेणेकरून तरुणाई आपल्याकडे आकर्षित होईल.”मोठ्या चौक सभा करण्यापेक्षा सोसायट्यांमध्ये आणि छोट्या वस्त्यांमध्ये ‘पॉकेट मीटिंग्स’ (कोपरा सभा) घेण्यावर भर द्या. लोकांच्या थेट समस्या ऐकून त्या सोडवण्याचे आश्वासन द्या, असेही त्यांनी यावेळी सांगितले.पुण्यात राष्ट्रवादीची मुख्य लढत भाजपसोबत असल्याचे पवारांनी आधीच स्पष्ट केले आहे. “भाजपच्या बालेकिल्ल्यात जाऊन तिथल्या समस्या (उदा. वाहतूक कोंडी, पाणी प्रश्न) लावून धरा. आपण केलेल्या विकासकामांची तुलना भाजपच्या पाच वर्षांच्या सत्तेशी करा,” असा आदेश अजित पवारांनी दिला आहे.उमेदवारांच्या निवडीबाबत बोलताना अजित पवारांनी स्पष्ट केले की, जनतेमध्ये दहशत असलेल्यांना थारा दिला जाणार नाही. “शिवाजीनगर असो वा उपनगरे, कोणत्याही वादात पडू नका. आपली प्रतिमा स्वच्छ ठेवा. कायदा व सुव्यवस्था राखणे ही आपली जबाबदारी आहे,” असे त्यांनी बजावले. माझ्यासाठी प्रत्येक प्रभाग महत्त्वाचा आहे. मला रिपोर्ट नका देऊ, मला रिझल्ट पाहिजे. जो लोकांसाठी धावेल, तोच महापालिकेत दिसेल, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे.राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. येत्या 15 तारखेला मतदान होणार असून 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल हाती येणार आहे. त्यांच्या प्रचाराचा धुराळा उडाला आहे. सर्वच प्रमुख नेते मैदानात उतरले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे दौऱ्यावर आले.

### काय आहे ‘अनोखा’ कानमंत्र?

पुणे महापालिका निवडणुकीच्या (PMC ELECTION 2026) रणधुमाळीत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) मोठी झेप घेतली आहे. “केवळ उमेदवार म्हणून मिरवू नका, तर प्रत्येक घराचा सदस्य बना,” अशा कडक शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नगरसेवक पदाच्या इच्छुकांना आणि उमेदवारांना विशेष मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी काही ‘अनोखे’ आणि ‘प्रॅक्टिकल’ फंडे कार्यकर्त्यांना दिले.

# पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसला नवे बळ!

## वैशालीताई कामसदर यांची महिला कार्याध्यक्षपदी नियुक्ती

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य वैशालीताई कामसदर यांची पुणे महिला कार्याध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. आगामी कार्यकाळासाठी त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमात लहूजी जगदे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत जाहीर प्रवेश केला.**



पक्ष संघटन अधिक बळकट करणे, पक्षाची ताकद तळागाळापर्यंत अधिक भक्कम करणे आणि जनतेशी जोडलेली कार्यसंस्कृती मजबूत करणे हा प्रत्येकाचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नव्या सहकाऱ्यांच्या सहभागातून हा उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होत असल्याचे समाधान व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांचे मनापासून स्वागत केले आणि पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बाणेर येथे आयोजित “विजयी संकल्प सभा” या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सुस–म्हाळुंगे परिसरातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत प्रवेश केला.

यावेळी प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, अमोल बालवडकर यांना उमेदवारी न देण्याच्या निर्णयामुळे परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. हा निर्णय अन्यायकारक असून कार्यकर्त्यांच्या भावना दुर्लक्षित करणारा आहे,

अशी भावना सुस–म्हाळुंगे परिसरात व्यक्त होत आहे. सुस–म्हाळुंगे गावातील अनेक कार्यकर्त्यांनी सामूहिक निर्णय घेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### पक्षात अधिकृत जाहीर प्रवेश

नागरिकांशी असलेला थेट संवाद पाहता अमोल बालवडकर यांना तिकीट नाकारणे समजण्यापलीकडे आहे. त्यामुळे आपली भूमिका स्पष्ट करत आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत असल्याचे त्यांनी सांगितले.दस्य वैशालीताई कामसदर यांची पुणे महिला कार्याध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. आगामी कार्यकाळासाठी त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमात लहूजी जगदे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत जाहीर प्रवेश केला.

## महानगरपालिका निवडणूकः महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा पिंपरीत थेट इशारा

# 'मागची पानं चाळली तर..!

### अजित दादांना बोलता येणार नाही'; महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप–राष्ट्रवादीत वाकयुद्ध

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर येऊ लागले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील शाब्दिक संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्याला उत्तर देताना महसूल मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी पिंपरी चिंचवडमधील दिघी येथील सभेत अजित पवारांना थेट शब्दांत इशारा दिला आहे. "आम्ही मागची पानं चाळली, उलटली तर अजित दादांना बोलता येणार नाही," असं स्पष्ट म्हणत बावनकुळे यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना सावध केलं आहे.**




पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर अप्रत्यक्ष हल्लाबोल केला होता. माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे सगळ्यांना माहिती आहे. मात्र ज्यांनी माझ्यावर आरोप केले, तेच आज माझ्यासोबत सत्तेत बसले आहेत, असा टोला अजित पवार यांनी भाजपच्या नेत्यांना लगावला. त्यांच्या या वक्तव्यामुळे महायुतीतील तणाव पुन्हा एकदा समोर आला.

अजित पवारांच्या या विधानावर आधी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलं होतं. त्यानंतर आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट आणि मोजक्या शब्दांत अजित पवारांना डिवचलं आहे. दिघी येथील सभेत बोलताना बावनकुळे म्हणाले, "७० हजार कोटींच्या प्रकरणाची सुनावणी अजून न्यायालयात सुरू आहे. त्याचा निकाल लागलेला नाही. हे काही अभिमानास्पद नाही. शेवटी केस विचाराधीन आहे. निकाल काय लागेल, त्यावर पुढचं सगळं ठरेल." या शब्दांत त्यांनी अजित पवारांच्या वक्तव्यावर अप्रत्यक्ष टीका केली.

बावनकुळे यांनी पुढे सांगितलं की, "अजित दादा हे प्रगल्भ आणि अनुभवी नेते आहेत. एवढ्या छोट्या निवडणुकीसाठी अशा बाबी बाहेर काढणं आणि एका महापालिकेसाठी महायुतीत मनभेद निर्माण करणं योग्य नाही. अजित दादा याचा नक्कीच विचार करतील. बोलता खूप येईल, पण ही ती वेळ नाही." अशा शब्दांत त्यांनी संयम बाळगण्याचं आवाहन केलं.

महायुतीतील समन्वयाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, "अजित दादांना सल्ला देण्याइतका मी मोठा नाही. मात्र महायुतीत मनभेद आणि मतभेद निर्माण होईल, असं बोलायचं नाही, असं समन्वय बैठकीत ठरलं होतं. तरीही त्यांनी असं का बोललं, याची मला कल्पना नाही. ते राज्यातील महत्त्वाचे नेते आहेत, त्यामुळे मी फार सल्ला देणार नाही." असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली.

याचवेळी बावनकुळे यांनी पिंपरी चिंचवडमधील राष्ट्रवादीच्या सत्तेवरही बोट ठेवलं. "पिंपरी चिंचवडमध्ये अजित दादा अनेक वर्षे सत्तेत होते. त्या काळात काय झालं, हे जर आम्ही मागची पानं उलटून पाहायला लागलो, तर त्यांनाही बोलता येणार नाही," असा थेट इशारा त्यांनी दिला. मात्र, "मागची पानं उलटायची आमची इच्छा नाही," असं सांगत त्यांनी सध्या तरी संयम राखण्याची भूमिका घेतली. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्यातील सत्ताधारी महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याचं चित्र स्पष्ट होत आहे.

एकीकडे एकत्र सरकारमध्ये सहभागी असलेले भाजप आणि राष्ट्रवादी नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. यामुळे आगामी निवडणुकांमध्ये महायुतीची एकजूट कितपत टिकून राहील, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

### भाजपने 'मागची पानं' इशाऱ्याच्या माध्यमातून राष्ट्रवादीला सावध केलं

राजकीय विश्लेषकांच्या मते, अजित पवारांनी ७० हजार कोटींच्या आरोपांचा मुद्दा उपस्थित करून भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला, तर भाजपने 'मागची पानं' या इशाऱ्याच्या माध्यमातून राष्ट्रवादीला सावध केलं आहे. या वाकयुद्धाचा थेट परिणाम पिंपरी चिंचवडसह राज्यातील इतर महानगरपालिका निवडणुकांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकूणच, पिंपरी चिंचवडमधील या वक्तव्यांमुळे महायुतीतील अंतर्गत तणाव पुन्हा एकदा उफाळून आला असून, आगामी काळात नेते संयम राखतात की संघर्ष अधिक तीव्र होतो, याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

---

## कॅप्टन ऋतुराज कदम प्रजासत्ताक दिनानिमित्त परेडमध्ये सहभाग नोंदविणार

### शिक्षण विश्वः प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला बहुमान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ डी वाय पाटील प्रतिष्ठान संचलित डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आकुर्डी पुणे येथील एनसीसी कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांची प्रजासत्ताक दिन शिबिर आरडीसी २०२६ मधील बेस्ट कॅडेट स्पर्धेसाठी निवड झाली असून ही बाब महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरली आहे**



आरडीसी हे नॅशनल कॅडेट कॉर्प्स अंतर्गत आयोजित होणारे सर्वोच्च राष्ट्रीय स्तरावरील शिबिर असून ते जानेवारी २०२६ मध्ये नवी दिल्ली येथील कॅरिअप्पा परेड मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे २६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिन परेडमध्ये सहभाग हा या शिबिराचा प्रमुख टप्पा असतो

कठोर व बहुस्तरीय निवड प्रक्रियेतून निवड झालेल्या कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांनी उत्कृष्ट शिस्त नेतृत्वगुण शारीरिक क्षमता तसेच राष्ट्रीय सेवेप्रती निष्ठा सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे ट्रस्टी तेजस पाटील यांनी अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले कॅम्पस डायरेक्टर ॲडमिरल अमित विक्रम निवृत्त यांनीही या यशाबद्दल शुभेच्छा देत महाविद्यालयाचा गौरव वाढविल्याबद्दल अभिनंदन केले. प्राचार्या डॉ. पी मालती यांनी कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच डीन प्रशासन डॉ एस एस सरनोबत डीन विद्यार्थी कल्याण डॉ स्मिता पाटसकर आणि रजिस्ट्रार प्रशांत भालेराव यांनीही अभिनंदन करून एनसीसी क्षेत्रातील यशाचे महत्त्व अधोरेखित केले.

एनसीसी सी टी ओ डॉ विनोद हिवसे यांनी कॅडेटला योग्य मार्गदर्शन केले असून भविष्यातही रुतुराज कदम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एनसीसी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करतील असा विश्वास व्यक्त केला..डॉ डी वाय पाटील प्रतिष्ठान संचलित डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



## भूमिका

# ॲपचलित अर्थव्यवस्थेत हक्कांची ऐशीतैशी

**रात्रीची सव्वानऊची वेळ. शहरातल्या बहुतांश घरांत जेवणाची तयारी चालू आहे, पण रोहित अजूनही पुण्याच्या रस्त्यांवर त्याची गाडी वेगाने पळवत आहे. त्याच्या फोनवर पुन्हा व्हायब्रेशन- "हरी अप! कस्टमर वेटिंग." तो स्क्रीनकडे पाहतो, कपाळावरचा घाम पुसतो आणि स्वत:शी पुटपुटतो, "दोन मिनिटांत पोहोचतो... आणखी एक रेटिंग कमी झाला तर माझा दिवस बुडेल."**

रोहितसारखे लाखो युवक भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थेची चाके फिरवतात. कधी अन्न पोहोचवत, कधी प्रवासी, तर कधी पार्सल्स. आपल्याला मिळणारी ही 'वेगवान सोय' इतकी सहज आणि सवयीची झाली आहे की, या सगळ्यामागे कोणाचे श्रम आहेत? कोणाच्या आरोग्याची तडजोड होते? कोणाची सुरक्षितता धोक्यात येते? हे तर पाहिले जात नाहीच. उलट या कामगारांनी संप केला तर लोकांचा राग कंपन्यांवर नव्हे, या कामगारांवरच व्यक्त होतो. अलीकडेच रुबाल फाऊंडेशन आणि सीवायडीए (सायडा) इंडिया यांनी पुण्यातील २०५ गिग वर्कर्सवर केलेल्या अभ्यासाने या कामामध्ये 'लवचीकता' आणि 'स्वातंत्र्य' अशा चमकदार पॅकेजिंगमागचे वास्तव उघड केले आहे. गिग वर्क म्हणजे स्वातंत्र्य नाही, संधी नाही, नावीन्य तरच नाहीच पण अनिश्चित रोजगार आणि एकजूट




नसलेल्या कामगारांचे आधुनिक शोषण, असा त्या निरीक्षणांचा अन्वयार्थ.गिग वर्क आकर्षक वा ठोस करिअर नसून बेरोजगारीचा परिणाम आहे. नियमित आणि सुरक्षित नोकऱ्या कमी होत आहेत, तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे, आणि औपचारिक क्षेत्रात प्रवेश करणे अवघड होत आहे.अभ्यासातील निरीक्षणे चिंताजनक आहेत. सर्वेक्षणातील तीनपैकी दोन कामगार २२ ते ३५ वयोगटातील आहेत. हे वय सुरक्षित नोकरी, स्थिर उत्पन्न आणि कौशल्यवृद्धीचे असायला हवे. पण त्यांचा दिवस ऊन, पाऊस, वाहतूक कोंडी यांना तोंड देत ॲपमध्ये आलेल्या ऑर्डर पूर्ण करण्यात जातो. अभ्यासातून पुढे आले आहे की, ८०-९० कामगारांकडे उत्पन्नाचा दुसरा स्रोत नाही. बरेच जण ग्रामीण भागातून आलेले. कित्येक १०वी-१२वीपर्यंत शिक्षण घेतलेले. असेही दिसून आले आहे की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी तरुणांमध्ये 'उशिरा लग्नाची समस्या' वाढत आहे, कारण अनेक मुली आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी लग्न करण्यास नकार देत आहेत. आणि पगारदार 'गिग-आधारित रोजगार' करीत असलेल्या जोडीदारांना प्राधान्य देत आहेत. परिणामी, 'स्थलांतरित ग्रामीण तरुण, जरी अनेकदा 'अनिश्चित किंवा तात्पुरत्या' नोकऱ्यांमध्ये गुंतलेले असले तरी, गिग अर्थव्यवस्थेत त्यांना 'नियमित मासिक उत्पन्न' असण्याच्या समजुतीमुळे विवाह जोडीदार मिळण्याची शक्यता वाढते.गिग कामात 'फ्लेक्सिबिलिटी' हा सगळ्यात मोठा भ्रम प्लॅटफॉर्म कंपन्या सतत आणि जोरदार जाहिरात करतात ती म्हणजे 'हवे तेव्हा काम करा, तुम्हीच तुमचे बॉस.' पण वास्तव उलट आहे. बहुतेक गिग वर्कर्स दिवसाला १० ते १४ तास रस्त्यावर असतात. कारण गिग वर्कर्सच्या पगाराचा ढाचा हा 'काम कराल तेवढा पगार' (प्रोत्साहन भत्ता) असा आहे.ॲपमध्ये लॉग ऑफ केल्यावर ऑर्डर्स कमी मिळतात. ब्रेक घेतल्यास कमाई घटते. ॲप तुमचा वेग ठरवते, मार्ग ठरवते, दंड ठरवते, आणि बक्षिसेही. कामगाराची भूमिका फक्त एक : कंपनीने दिलेल्या ॲपचे आदेश पाळा. हे स्वातंत्र्य नव्हे तर गिग वर्कर्ससाठी डिजिटल गुलामगिरी आहे.अभ्यासानुसार, ८९ टक्के कामगार सतत तणावाखाली असतात. अर्ध्याहून अधिक कामगारांना पाठदुखी, स्नायूंमध्ये वेदना, थकवा, डोकेदुखी किंवा झोपेचे विकार जाणवतात. वाहतुकीतील अपघात सामान्य झाले आहेत आणि ७२ टक्के जण आपला वैद्याकीय खर्च स्वत:च करतात. ॲपचे नोटिफिकेशनही काहींसाठी मानसिक दडपणाचा स्रोत आहे. कारण त्यावर दिवसभराच्या कमाईचे भविष्य अवलंबून असते.महिला गिग कामगारांना अतिरिक्त आव्हानांचा सामना करावा लागतो. सर्वेक्षणात त्यांचे प्रमाण फक्त पाच टक्के. रात्रीच्या वेळी सुरक्षितता, छळ, शौचालयाच्या सुविधांचा अभाव, घरून होत असलेला विरोध/संशय यांसारख्या चिंता असल्याची कारणे त्यांनी दिली आहेत.

## प्रासंगिक »

### तीन तिघाडा

***व्हेनेझुएलापाठोपाठ तेलसमृद्धी आहे ती रशिया आणि इराणकडे- यापैकी रशिया ट्रम्प यांना इतरत्र नाही तरी स्वत:च्या भूमीवर रोखू शकतो, म्हणजे आता उरला इराण...***

एखाद्या देशात नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिज तेल यांचे विपुल साठे आहेत इतकेच त्या देशाच्या प्रगतीसाठी पुरेसे नसते. या नैसर्गिक खनिज संपत्तीचे रास्त उत्खनन आणि नंतर उत्पादन यांत रूपांतर झाले नाही तर अशी संपत्ती असलेले देशही कंगालच राहतात आणि आक्रमकांचे भक्ष्य ठरतात. व्हेनेझुएला हे ताजे उदाहरण. उत्तम खनिज संपत्तीचे साठे असूनही व्हेनेझुएला योग्य आर्थिक प्रगती गाठू शकला नाही. वास्तविक या देशातील खनिज तेलाचे महत्त्व ज्यांस पहिल्यांदा समजले आणि ज्याच्या पुढाकाराने तेल निर्यातदार देशांची संघटना (ऑर्गनायझेशन ऑफ ऑइल एक्स्पोर्टिंग कंट्रीज ऊर्फ ओपेक) जन्मास आली ते व्हेनेझुएलातील मंत्री युआन पाब्लो अल्फान्सो यांनी सुमारे ७० वर्षांपूर्वी आपल्या देशवासीयांना इशारा देऊन या वास्तवाची जाणीव करून दिली होती.

ठाणे महापालिकेकडे मलनिस्सारण, कचरा व्यवस्थापन सुविधा नाही. फेरीवाल्यांवर नियंत्रण नाही. या शहरात केवळ राजकीय हित पाहिले जाते, लोकहित पाहिले जात नाही. ठाण्यात इतके राजकारणी आहेत की, प्रत्येकाने त्यांचा प्रभाग तयार केला आहे. हा प्रभाग म्हणजे ठरावीक राजकारण्यांची मक्तेदारी असे चित्र आहे

# लोकहित नाही, तर राजकीय हितच पाहिले जाते

.'साहेबां'नी सांगितले ते करायचे, वाकायचे अशी पद्धत ठाण्यात रुजली आहे. ठाण्यात विकास प्रकल्पांचा मोठा गवगवा सुरू आहे. भरपूर एफएसआयमुळे उंच इमारती उभ्या राहात आहेत. बोगद्यांचे प्रकल्प, खाडीकिनारी उड्डाणपुलांची ठाण्यात चलती दिसते. परंतु हा विकास साधत असताना पर्यावरणाचा समतोल राखला जातोय का, याचे उत्तर नकारात्मकच मिळेल. ठाण्यात समस्यांविषयी आवाज उठविणारे, चळवळीत उतरणारे, नागरी प्रश्नांवर टाहो फोडणारेही कमी झाले आहेत. या शहराचा प्रवास बिहारच्या दिशेने केव्हाच सुरू झालाय.या शहरात कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी कोणतीही उपाययोजना नाही. शहराचा सर्व कचरा उचलून ठाण्याच्या हद्दीवरील कांदळवन क्षेत्रात टाकला जातो. या कामात ठाणे महापालिकेचा कोणीही हात धरू शकत नाही. ठाणे महापालिकेसारखी निर्दयी आणि बेजबाबदार महापालिका पाहिलेली नाही. ठाणे महापालिकेचे कचरा या



मूलभूत प्रश्नासंबंधी कोणतेही नियोजन नाही किंवा योजना नाही. फक्त कचरा उचला आणि कुठे तरी नेऊन टाका. या शहराचा उकिरडा होत असताना महापालिका बघ्याच्या भूमिकेत आहे. ठाणे हे मुंबई महानगर प्रदेशातील अतिशय महत्त्वाचे आणि केंद्रस्थानी असलेले शहर आहे.

मात्र कोणतेही ठोस नियोजन, आखणी या शहराला नाही. पर्यावरणाचे कोणतेही नियम या शहरात पाळले जात नाहीत. मागील पशुपक्षी जनगणनेत, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ५० टक्के प्राणी कमी आढळले. याचे मुख्य कारण, म्हणजे मानवाचे जंगलामधील अतिक्रमण हे होते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ३० हजार नागरिक राहतात. याचा परिणाम प्राण्यांच्या अधिवासावर होतो. ठाण्यातील येऊरसारख्या परिसरात अनधिकृत बांधकामे आहेत. ही बांधकामे तोडण्याचे आदेश २००९ साली उच्च न्यायालयाने दिले होते. बांधकामे तोडण्याऐवजी नवी बांधकामे करण्यास महापालिका परवानगी देत आहेत.

अधिसूचनेनुसार नवीन बांधकामे ही भूमिपुत्रांसाठीच आहेत. आदिवासी, भूमिपुत्र येथे बांधकामे करू शकतो. या भूमिपुत्रांच्या नावाने येथे बंगल्यांच्या रांगा उभ्या राहात आहेत. हे पटेल, शहा हे येऊरचे भूमिपुत्र कसे आणि कधी झाले? शहरात प्रकल्प कामे तसेच इतर कामांसाठी वृक्षतोड केली जात आहे. मात्र वृक्षतोड रोखण्याची जबाबदारी नगरसेवकांची आहे. नगरसेवकाची लेखी परवानगी किंवा संमती असल्याशिवाय पालिकेने वृक्ष कापू नयेत. नगरसेवकाची लेखी परवानगी असणे आवश्यक आहे. शहरात पालिका निवडणुका येऊ घातल्या आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

'तपोवन वाचवा' चळवळ

## 'तपोवन वाचवा' १२२ उमेदवारांची यादी करणार प्रसिद्ध !

# निवडणुकीत पर्यावरण केंद्रस्थानी!

## १२७० झाडे तोडल्याचे उघड

### भाकपच्या जाहीरनाम्यात स्थान

वृक्षतोडीचा गाजणारा विषय महापालिका निवडणुकीत प्रचाराच्या केंद्रस्थानी आला आहे. घरोघरी प्रचार करणाऱ्या उमेदवारांना नागरिक तपोवनातील वृक्षांबाबत विचारणा करीत असल्याकडे तपोवन वाचवा चळवळीकडून लक्ष वेधले जात आहे. या घडामोडींमुळे उमेदवारांची पावले तपोवनकडे वळली असून नाशिकचा आगामी महापौर पर्यावरणवादी विचारांचाच होणार असल्याचा दावा केला जात आहे.



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी कुंभमेळ्यात साधुग्राम उभारणीसाठी तपोवनातील वृक्षतोडीचा गाजणारा विषय महापालिका निवडणुकीत प्रचाराच्या केंद्रस्थानी आला आहे. घरोघरी प्रचार करणाऱ्या उमेदवारांना नागरिक तपोवनातील वृक्षांबाबत विचारणा करीत असल्याकडे तपोवन वाचवा चळवळीकडून लक्ष वेधले जात आहे. या घडामोडींमुळे उमेदवारांची पावले तपोवनकडे वळली असून नाशिकचा आगामी महापौर पर्यावरणवादी विचारांचाच होणार असल्याचा दावा केला जात आहे. तपोवनातील झाडे वाचविण्यासाठी भूमिका घेणाऱ्या ३१ प्रभागातील १२२ उमेदवारांची नावे 'तपोवन वाचवा' चळवळ जाहीर करणार आहे.**

मागील काही महापालिका निवडणुकांमध्ये गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्याचा विषय सर्वपक्षांच्या कार्यक्रम पत्रिकेत होता. यावेळी गोदावरी प्रदूषणाबरोबर तपोवनातील वृक्षतोडीसह एकूणच पर्यावरण हा विषय कळीचा मुद्दा ठरला आहे. पालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत तपोवनातील प्रस्तावित १८२५ वृक्षतोडीचा मुद्दा गाजत आहे. यावरून मागील एक ते दीड महिना बरेच रणकंदन उडाले होते. भाजपचे कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने शहरात १५ हजार वृक्ष लागवडीसाठी हरित नाशिक उपक्रम हाती घेतला गेला. तपोवनातील आंदोलक आणि भाजप नेते यांच्यात बरेच आरोप-प्रत्यारोप झाले. या काळात सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी १२७० झाडे तोडल्याचे उघड झाले.राष्ट्रीय हरित लवादाने प्रथम तपोवनातील आणि आता संपूर्ण जिल्ह्यात वृक्षतोडीला तात्पुरती स्थगिती दिल्यामुळे तूर्तास तपोवनात काहिशी शांतता असली तरी निवडणूक प्रचारात हा मुद्दा गाजत आहे. अलीकडेच माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी तपोवनात भेट देऊन पाहणी केली होती. ठाकरे गटाचे सर्व उमेदवार तपोवन वृक्ष वाचविण्यासाठी कटिबद्ध असतील, त्यासाठी ते प्रतिज्ञापत्रही देतील, असे त्यांनी सूचित केले होते.तपोवन वाचवा मोहिमेकडे आतापर्यंत ठाकरे गटासह अन्य पक्षीय अशा एकूण १२ उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र प्राप्त झाल्याची माहिती तपोवन वाचवा चळवळीचे रोहन देशपांडे यांनी दिली. यात माजी उपमहापौर प्रथमेश गिते, तलाह गुलाब शेख, हेमंत गायकवाड, गुलजार कोकणी, गायत्री गाडेकर, सीमा पवार, हेमंत गायकवाड, जयेश बर्वे, अश्विन पवार, योगिता गायकवाड, जितेंद्र भावे, जगबीर सिंग यांचा समावेश आहे. घरोघरी प्रचार करणाऱ्या उमेदवारांना नागरिकच तपोवनातील वृक्षांबाबत भूमिका विचारत आहेत. त्यामुळे उमेदवार तपोवनकडे येऊ लागले आहेत. तपोवन वाचवा चळवळीकडून सर्व ३१ प्रभागातील पर्यावरणप्रेमी १२२ उमेदवारांची नावे जाहीर केली जाणार आहेत. नाशिकचा महापौर पर्यावरणवादी होणार असल्याचा दावा देशपांडे यांनी केला.शिवसेना ठाकरे गटापाठोपाठ भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (भाकप) थेट निवडणूक जाहीरनाम्यातच पर्यावरण संरक्षणाचा मुद्दा समाविष्ट करीत तपोवनातील वृक्षतोड रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे म्हटले आहे. भाकपच्या जाहीरनाम्यात शहरातील विविध प्रश्नांबरोबर पर्यावरण संरक्षणाचा मुद्दा अधोरेखीत करण्यात आला.

पक्षाचे राज्य सहसचिव राजू देसले यांनी भाकपने बी. डी. भालेकर शाळा वाचवा आंदोलन, तपोवन वाचवा चळवळ, शेतकरी– कामगारांच्या प्रश्नांवरील लढे यामधून पक्षाने आपली भूमिका ठामपणे मांडल्याचा दावा केला.

# राज्यातील सहकारी कारखान्यांची झाडाझडती

## एनसीडीसीचा आदेश, कर्जाचा दुरूपयोग झाल्याचे उघड

### शिफारस करण्यासाठी समिती

एनसीडीसीकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या विनियोगात गंभीर उल्लंघन झाल्याचे समोर आले आहे. संबंधित कारखान्यांची चौकशी करून कारवाई बाबत शिफारस करण्यासाठी समितीची स्थापना केली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर नियमांनुसार कारवाई केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात उसाच्या गळीत हंगाम ऐन बहरात असतानाच राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून (एनसीडीसी) घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या विनियोगात साखर कारखान्यांनी गंभीर उल्लंघन केल्याचे समोर आले आहे. कर्ज घेतलेल्या ३२ पैकी फक्त सहा कारखान्यांनी नियमानुसार कर्ज रक्कमेचा विनियोग केला आहे. उर्वरीत २६ कारखान्यांची राज्य सरकारच्या समितीकडून चौकशी केली जाणार आहे.**

राज्याच्या सहकार विभागाने मंगळवारी शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्यानुसार कर्ज विनियोग नियमांचे उल्लंघन केलेल्या कारखान्यांची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना केली असून, समितीच्या चौकशीनंतर एनसीडीसीला फेर अहवाल सादर केला जाणार आहे.एनसीडीसीने पाहणी केल्यानंतर राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाच्या विनियोगात उल्लंघन झाले असल्याचे समोर आले होते. एनसीडीसीने ऑक्टोबर २०२५ मध्ये एक पत्र पाठवून राज्य सरकारला या बाबत कळविले होते.



तसेच या प्रकाराबाबत राज्य सरकारने काय कारवाई केली, याची माहिती एनसीडीसीला कळवावी, असेही म्हटले होते. सहकारी साखर कारखान्यांना बळकटी देण्यासाठी अनुदान, या योजनेअंतर्गत एनसीडीसीने राज्यातील ३२ सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भांडवलाची (मार्जिन मनी) आवश्यकता पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारच्या मार्फत ४,३५५.१२ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. त्यापैकी २१ सहकारी साखर कारखान्यांनी कर्जाच्या वापरात गंभीर स्वरुपाचे उल्लंघन केले आहे. तीन साखर कारखान्यांनी काही प्रमाणात उल्लंघन केले आहे. उर्वरीत सहा साखर कारखान्यांनी कर्जाच्या अटी शर्तीनुसार कर्ज रक्कमेचा विनियोग केल्याचे एनसीडीसीला आढळून आले आहे. एनसीडीसीच्या आदेशानुसार कर्ज घेतलेल्या सहकारी साखर कारखान्यांनी कर्ज रक्कमेचा विनियोग तपासून कर्जाच्या विनियोगात उल्लंघन केलेल्या कारखान्यांवर काय कारवाई करावी, या बाबत शिफारस करण्यासाठी समितीची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्ष साखर आयुक्त असणार आहेत. संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) सदस्य, तर अर्थ विभागाचे साखर संचालक सदस्य सचिव म्हणून काम करणार आहेत.

## ब्राह्मण आमदारांची बैठक

## ब्राम्हण नेत्यांच्या बैठकीमुळे भाजपा अडचणीत?

# पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेश विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान ब्राह्मण आमदारांच्या एका बैठकीने भारतीय जनता पक्षाला (भाजपा) अडचणीत आणले आहे. जातीपातीच्या राजकारणावरून निर्माण झालेली ही अस्वस्थता पक्षांतर्गत मोठ्या संकटात बदलू नये यासाठी भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वाला 'डॅमेज कंट्रोल' करावे लागत आहे. लखनौमध्ये २३ डिसेंबर रोजी झालेल्या ब्राह्मण आमदारांच्या या बैठकीमुळे जातीआधारित संघटन, शिस्त आणि प्रतिनिधित्व या विषयांवरील पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.**

### नाराज आमदारांची समजूत



हा वाद वाढत असल्याने भाजपाने माजी प्रदेशाध्यक्ष व ज्येष्ठ ब्राह्मण नेते रमापती राम त्रिपाठी यांच्यावर नाराज आमदारांची समजूत काढण्याची आणि पक्षांतर्गत संतुलन राखण्याची जबाबदारी सोपवली आहे. देवरियाचे माजी खासदार व पूर्वांचलमधील भाजपाचा प्रमुख चेहरा रमापती राम त्रिपाठी यांनी मंगळवारी देवरियाचे आमदार शलभ मणी त्रिपाठी यांची भेट घेतली. त्यांनी अनेक ब्राह्मण आमदारांशी फोनवरही चर्चा केली असून, त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. तसेच, पक्षनेतृत्व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार असल्याचे आश्वासनही दिले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, त्रिपाठी यांनी आमदारांना आपल्या समस्या थेट संघटनात्मक नेतृत्वाकडे मांडण्याचा सल्ला दिला आहे. याच दिवशी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतली. राजकीय वर्तुळात ही भेट ब्राह्मण आमदारांच्या बैठकीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीशी जोडली जात आहे. चौधरी यांनी यापूर्वीच आमदारांना कडक इशारा दिला होता की, भविष्यात अशा प्रकारच्या कोणत्याही बैठकीकडे 'शिस्तभंग' म्हणून पाहिले जाईल आणि त्यावर कारवाई केली जाईल.मात्र, विधानसभा अधिवेशन सुरू असताना एवढ्या मोठ्या संख्येने एका विशिष्ट जातीच्या आमदारांनी एकत्र येण्यामुळे भाजपाची चिंता वाढली.

सूत्रांनुसार, वरिष्ठ स्तरावर याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आणि मुख्यमंत्री कार्यालयाकडून यात हस्तक्षेप करण्यात आला. मुख्यमंत्र्यांचे

### विरोधकांचा भाजपावर हल्ला

उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य म्हणाले, "आमदारांचा दृष्टिकोन कदाचित चुकीचा असू शकतो; पण हेतू तसा नव्हता. लोक नेहमीच एकमेकांना भेटत असतात. प्रत्येक भेटीकडे जातीय चश्म्यातून पाहिले जाऊ नये," असे ते म्हणाले. मंत्री धर्मवीर प्रजापती आणि सुनील शर्मा यांनीही अशाच प्रकारची मते व्यक्त केली.

ओएसडी सरवण बघेल यांनी पाठक यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले, ज्यावर पाठक यांनी असा कोणताही राजकीय ठराव तिथे संमत झाला नसल्याचे सांगितले.

हे प्रकरण उघड बंडापर्यंत पोहोचू नये म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांनी पडद्यामागून हालचाली केल्याचे समजते. या चर्चेची माहिती असलेल्या सूत्रांच्या मते, ही बैठक ब्राह्मण आमदारांमधील खोलवर असलेली अस्वस्थता दर्शवते. भाजपाच्या कार्यप्रणालीत जातीआधारित मोर्चेबांधणीमुळे इतर गट प्रबळ झाले असताना, ब्राह्मणांची ताकद हळूहळू कमी होत असल्याची भावना या आमदारांमध्ये आहे. उपमुख्यमंत्री या समाजाचा असूनही खरी सत्ता आणि प्रभाव दुसरीकडेच वळला आहे, असे त्यांना वाटते. लखनौच्या डॉ. भीमराव आंबेडकर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख व राजकीय विश्लेषक शशिकांत पांडे यांच्या मते, या अस्वस्थतेकडे केवळ एक घटना म्हणून पाहता येणार नाही. "ब्राह्मण संख्येने प्रबळ नसले तरी ऐतिहासिकदृष्ट्या उत्तर प्रदेशच्या राजकारणात ते 'अजेंडा सेटर्स' राहिले आहेत. ज्या पक्षाला त्यांनी भरभरून पाठिंबा दिला, त्याच पक्षात आपला आवाज कमकुवत होत असल्याचे जेव्हा या गटाला वाटते, तेव्हा नेतृत्वाला त्याची दखल घ्यावीच लागते. हे बंडापेक्षा स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी केलेली फेरमांडणी आहे," असे पांडे म्हणाले.

# "हिंमत असेल तर मला पकडा"

## व्हेनेझुएला प्रकरणानंतर ट्रम्प यांना कोलंबियाच्या अध्यक्षांचं आव्हान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेने व्हेनेझुएलावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केलं. आता निकोलस मादुरो यांच्यावर अमेरिकेत खटला चालवला जाणार आहे. अमेरिकेने केलेल्या या कारवाईचा जगभरातील अनेक देशांनी निषेध व्यक्त केला आहे, तर व्हेनेझुएला सरकारने अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांला 'साम्राज्यवादी हल्ला' म्हटलं आहे.**

अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्यांनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियाला देखील खुली धमकी दिली होती. डोनाल्ड ट्रम्प पत्रकारांशी संवाद साधताना कोलंबियाच्या सरकार विरुद्ध थेट लष्करी कारवाईची धमकी दिली आणि अशी कारवाई 'मला चांगली वाटते', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं.ट्रम्प यांनी दिलेल्या धमकीनंतर आता कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प यांना खुलं आव्हान दिलं आहे. 'हिंमत असेल तर मला पकडा', असं कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी म्हटलं आहे. तसेच अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्यावरून गुस्तावो पेट्रो यांनी ट्रम्प यांच्यावर टीका



केली आहे.गुस्तावो पेट्रो यांनी व्हेनेझुएलावरील अमेरिकेने केलेल्या कारवाईचा सोमवारी तीव्र निषेध केला आणि ट्रम्प यांना उद्देशून दिलेल्या निवेदनात म्हटलं की, "मी वाट पाहत आहे, हिंमत असेल तर मला पकडून दाखवा." गुस्तावो पेट्रो पुढे म्हणाले की, "जर त्यांनी (अमेरिकेने) बॉम्बस्फोट (हल्ला) केला तर कोलंबियातील शेतकरी शस्त्रे हाती घेतील आणि पर्वतांमध्ये गनिमी युद्ध सुरू होऊ शकतं. जर त्यांनी (अमेरिकेने) राष्ट्रपतींना

### पेट्रो यांनी काय म्हटलं?

व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या अटकेनंतर व्हाईट व्हाऊसने निकोलस मादुरो यांचा एक जुना व्हिडीओ एक्सवर (ट्विटर) शेअर केला. या व्हिडीओमध्ये निकोलस मादुरो यांनी सुमारे आठ महिन्यांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना खुलं आव्हान दिलं होतं. "जर तुमच्यात हिंमत असेल तर मला पकडा. मी मिराफ्लोरेस (व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांचं निवासस्थान) मध्ये वाट पाहत आहे.

अटक केली तर, जनतेचा रोष जग्वारसारखा उफाळून येईल. आम्ही (कोलंबियाने) १९९० च्या दशकात शस्त्रे सोडली होती. मात्र, देशाच्या रक्षणासाठी पुन्हा शस्त्रे उचलण्यास मागेपुढे पाहणार नाहीत", असा इशारा गुस्तावो पेट्रो यांनी दिला आहे.कोलंबिया देखील खूप आजारी आहे. ज्यावर एका आजारी व्यक्तीचं राज्य आहे, ज्याला कोकेन बनवायला आणि ते अमेरिकेला विकायला आवडतं. मात्र, ते तो जास्त काळ करू शकणार नाही", यावेळी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांनी ट्रम्प यांना प्रश्न विचारला होता की, अमेरिका देशाविरुद्ध लष्करी कारवाई करणार का? या प्रश्नावर उत्तर देताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, "मला ते योग्य वाटतं.

# दीपिकासाठी कसं असेल 2026 हे वर्ष?



दीपिका पादुकोण मागील २ दशकांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. खेळ, मॉडेलिंग व नंतर अभिनय क्षेत्रात दीपिकाने पाऊल ठेवलं. दीपिकाने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. दीपिका पादुकोण उत्तम अभिनेत्री असण्याबरोबरच स्पष्टवक्ती आहे. ती मानसिक आरोग्याबद्दलही जाहिरपणे बोलत असते. दीपिका पादुकोण ५ जानेवारी रोजी ४० वर्षांची झाली. २०२५ मध्ये मुलीचा जन्म झाल्यावर दीपिका मोठ्या पडद्यापासून दूर आहे. लवकरच ती 'किंग'मध्ये झळकणार आहे. २०२५ मध्ये ८ तास काम या मागणीमुळे दीपिका चर्चेत राहिली. तिच्या या मागणीमुळे तिच्यावर टीकाही झाली. तर संदीप रेड्डी वांगाचा चित्रपटही हातातून गेला. आता २०२६ हे वर्ष दीपिका पादुकोणसाठी कसं असेल, त्याबद्दल जाणून घेऊयात.प्रसिद्ध लाइफ कोच आणि ॲस्ट्रो-वास्तु तज्ज्ञ श्रद्धा सल्ला यांनी फिल्मीबीटशी बोलताना दीपिका पादुकोणसाठी २०२६ हे वर्ष कसे असेल, त्याबद्दल अंदाज व्यक्त केले. त्यांनी काय म्हटलंय, ते जाणून घेऊयात.५ जानेवारी रोजी जन्मलेल्या दीपिका पादुकोणमध्ये अंकशास्त्रानुसार अंक ५ आणि मकर राशीच्या ज्योतिषीय ऊर्जेचं एक शक्तिशाली मिश्रण आहे. यावरून तिच्यातील जुळवून घेण्याची क्षमता, तिचं जागतिक स्तरावरील महत्त्व आणि भावनिकता दिसून येते. अंकशास्त्रानुसार, बुध ग्रहाचं राज्य असलेला ५ हा अंक गती, संवाद आणि उत्क्रांतीचे प्रतिनिधित्व करतो. या अंकात जन्मलेल्या व्यक्ती स्थिर नसतात. स्वतःमध्ये बदल घडवून आणणे, दीपिकाची शक्ती, संवाद कौशल्य, बुद्धिमत्ता आणि जुळवून घेण्याची क्षमता हे गुण अधिक प्रभावी ठरतील. दीपिका पादुकोणची खरी ताकद तिच्या मूळ स्वभावाला न सोडता स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याच्या क्षमतेत आहे. २०२६ मध्ये दीपिका स्पष्टता, विवेकबुद्धी आणि अर्थपूर्ण कथानक असलेल्या चित्रपटांमुळे करिअरमध्ये पुढे जाईल, असंही ज्योतिषांनी नमूद केलं.

# मराठी अभिनेत्रीच्या घरी अस्सल मालवणी बेत!



मालवणी किंवा कोकणी जेवण म्हटलं की भल्या भल्यांच्या तोंडाला पाणी सुटतं. कोंबडी वडे, मासे, मच्छीचं सार असे विविध पदार्थ डोळ्यासमोर येतात. मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार सुद्धा मूळचे कोकणातले आहेत. या कलाकारांच्या सोशल मीडिया पोस्टमधून आपल्याला कोकणातील पारंपरिक पदार्थ, कोकणातील निसर्ग सौंदर्य, येथील सणवार आणि अनेकदा कोंबडी वडे-फिश फ्राय अशा नॉनव्हेज पदार्थांची सुद्धा झलक पाहायला मिळते. अशातच एका लोकप्रिय अभिनेत्रीने शेअर केलेला अस्सल मालवणी जेवणाचा व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने नुकताच तिच्या घरी अस्सल मालवणी जेवणाचा बेत केला होता. हा व्हिडीओ अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. यामध्ये अपूर्वा स्वत: मासे बनवत असल्याचं पाहायला मिळत आहे.भरलेलं पापलेट, कोळंबी फ्राय, कोळंबी भात असा खास बेत तिने जेवणासाठी केला होता. "ही एकमेव किर्र-किर्र मी कायम ऐकू शकते ( फिश फ्राय करताना येणार आवाज )" असं अपूर्वा या व्हिडीओमध्ये चाहत्यांना सांगते. अभिनेत्रीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे.अपूर्वाच्या व्हिडीओवर "आयुष्य सुंदर आहे फक्त असे मासे मिळायला हवेत" अशी कमेंट एकाने केली आहे. यावर अभिनेत्री म्हणते, "यासाठी शूटिंग लवकर संपवून मालाड फिश मार्केट गाठलं. तिथून ठाण्याला ड्राइव्ह करून आले मग हे मासे बनवले...फक्त आईचा वाढदिवस होता म्हणून...पण, आज खऱ्या अर्थाने माहिमचं सिटीलाइट मार्केट मिस केलं...तिथे जे मासे मिळतात त्याला तोड नाय!" "तोंडाला पाणी सुटलं", "शेवंताची किर-किर पाहून मन सुखावलं", "मस्त बनवलेत मासे", "जमलंय ताई मस्त व्हिडीओ", "भारी बनवलंय", "अपूर्वा मॅम एक नंबर नादखुळा" अशा कमेंट्स या व्हिडीओवर आल्या आहेत.

# ती प्रेमळ स्वभावाची आहे

बॉलीवूड अभिनेत्री नर्गिस फाखरीचे नाव सध्या चर्चेत आहे, याचे कारण म्हणजे तिची बहीण आलिया फाखरीचे नाव तिचा एक्स बॉयफ्रेंड एडवर्ड जेकब्सच्या हत्येच्या आरोपांमध्ये समोर आले आहे. नर्गिसने या चर्चेदरम्यान पहिल्यादांच सोशल मीडियावर पोस्ट केली असून ही पोस्ट व्हायरल होत आहे. नर्गिसने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे. त्या स्टोरीत नर्गिसने फोटो पोस्ट केला असून त्याला एक लहानसे कॅप्शन दिले आहे.स्टोरीवर शेअर केलेल्या या फोटोमध्ये ती 'हाऊसफुल ५'मधील सोनम बाजवा आणि जॅकलीन फर्नांडिस या दोन अभिनेत्रींबरोबर दिसत आहे. या फोटोसह तिने "आम्ही येतोय!" अशी कॅप्शन दिली आहे. 'हाऊसफुल ५'मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख, फरदीन खान यांच्यासह अनेक कलाकार झळकणार आहेत. हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे. हा चित्रपट ६ जून २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून याचे दिग्दर्शन तरुण मनसुखानी करत आहेत. नर्गिस फाखरीच्या बहिणीवर तिच्या पूर्वाश्रमीचा प्रियकर एडवर्ड जेकब्सच्या हत्येचा आरोप आहे. तिला अमेरिकेतील रायकर्स आयलंड, न्यूयॉर्क येथे अटक करण्यात आली आहे.



# तुमचे वय झाले आहे

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखले जाणारे अभिनेते अमिताभ बच्चन सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टीमुळे चर्चेत असतात. सध्या ते कौन बनेगा करोडपती या लोकप्रिय शोचे सूत्रसंचालन करताना दिसत आहेत. या कार्यक्रमात ते प्रेक्षकांबरोबर अनेक गोष्टी, किस्से शेअर करत असतात. याबरोबरच, ते तंत्रज्ञानाबरोबर स्वत:ला अपडेट ठेवताना दिसतात. आता नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एका एपिसोडमध्ये बीग बींनी त्यांना जर गॅजेटसंबंधी काही प्रश्न पडले असतील तर ते त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना मदतीसाठी बोलवतात. त्यांची नातवंडे तसेच मुलगा अभिषेक यांची ते मदत घेतात.कौन बनेगा करोडपती' या शोमध्ये एका स्पर्धकाबरोबर बोलताना अमिताभ बच्चन यांनी म्हटले, "आपल्याला एखादा प्रश्न पडला तर त्याचवेळी आपल्याला उत्तर पाहिजे असते.

# बॉलीवूडमध्ये गटबाजी, 15 महिने काम नव्हतं

विवेक ओबेरॉयने २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कंपनी' चित्रपटातून मनोरंजन विश्वात पदार्पण केलं. यानंतर आलेल्या 'साथिया' चित्रपटात विवेक प्रेक्षकांना एका रोमँटिक हिरोच्या भूमिकेत पाहायला मिळाला. पण, बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेत अनेकदा कलाकारांना कठीण प्रसंगाचा सामना करावा लागतो. प्रचंड मेहनत घेऊनही विवेकला अनेक वर्षं फिल्म इंडस्ट्रीपासून दूर राहावं लागलं. यानंतर अभिनेत्याने मनोरंजन विश्वापासून पूर्णपणे ब्रेक घेत आपलं नशीब एका नव्या क्षेत्रात आजमावलं. उत्तम अभिनयाबरोबरच आजच्या घडीला विवेक ओबेरॉय आघाडीचा व्यावसायिक म्हणून ओळखला जातो.विवेकने नुकतीच 'इंडियन एक्स्प्रेस'च्या 'स्क्रीन'ला मुलाखत दिली, यावेळी त्याने त्याच्या 'चॉकलेट बॉय' इराापासून, पुढे बॉलीवूडमधला संघर्ष ते यशस्वी व्यावसायिक असा सगळा प्रवास उलगडून सांगितला आहे.विवेकम्हणाला, "मी माझ्या करिअरच्या गेल्या २२ वर्षांमध्ये जवळपास ६७ प्रोजेक्ट्समध्ये काम केलंय. पण, या इंडस्ट्रीबाबत तुम्ही कोणत्याही प्रकारची शाश्वती देऊ शकत नाही. तुम्ही उत्तम काम करता, पुरस्कार जिंकता, आपलं काम व्यवस्थित मन लावून करता, एक अभिनेता म्हणून तुम्ही सगळ्या गोष्टी करता पण, इतकं सगळं करूनही तुम्हाला काही क्षुल्लक आणि वेगळ्याच कारणांनी काम दिलं जात नाही. २००७ मध्ये मी 'शूटआउट ॲट लोखंडवाला' या सिनेमात काम केलं होतं आणि त्यातलं 'गणपत...' हे गाणं प्रचंड व्हायरल झालं.

**क्रिकेट करार रद्द** — कोलकाता संघावर कोणतेही बंधन नाही

# मुस्तफिझूरला भरपाईची शक्यता कमी

## मुस्तफिझूरला संघातून केले मुक्त

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर 'आयपीएल' संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघातून मुक्त केले असले, तरी त्याला कोणतीही आर्थिक नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता कमी आहे. क्रिकेटेतर कारणांनी हा निर्णय घेण्यात आल्याने मुस्तफिझूरला भरपाई देण्यास कोलकाता संघावर कोणतेही बंधन नाही.**




'आयपीएल' खेळाडू लिलावात कोलकाता संघाने मुस्तफिझूरसाठी ९.२० कोटी रुपयांची विजयी बोली लावली. मात्र, त्याला स्पर्धेत खेळण्यास मज्जाव करण्यात आला आहे. 'बीसीसीआय'ने मुस्तफिझूरला लीगमधून दूर करण्याचे कारण स्पष्ट केले नाही. 'सध्याची परिस्थिती' लक्षात घेता हे आदेश देण्यात आल्याचे 'बीसीसीआय'चे सचिव देवजित सैकित म्हणाले होते. काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदूविरोधात हिंसाचार वाढत असल्याने भारतातील काही राजकीय पक्षांनी दडपण आणल्यामुळेच 'बीसीसीआय'ने हे पाऊल उचलल्याची चर्चा आहे.त्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आक्रमक भूमिका घेताना आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेमधील भारतातील सामने श्रीलंका येथे हलविण्याची 'आयसीसी'कडे मागणी केली. पाठोपाठ बांगलादेशमधील हंगामी सरकारने देशात 'आयपीएल' सामन्यांच्या प्रसारणावरही बंदी घातली.या सगळ्यात मुस्तफिझूरचा कोणताही दोष नसला, तरी त्याला नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता कमीच आहे.मुस्तफिझूरने स्पर्धेतून स्वेच्छेने माघार घेतलेली नाही किंवा त्याच्यावर कोणताही गैरप्रकाराचा आरोप नाही, असे असतानाही विद्यमान विमा व्यवस्थेमुळे भरपाईस फारसा वाव नसल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. "आयपीएलमधील सर्व खेळाडूंच्या पगाराचा विमा असतो. परदेशी खेळाडू संघाच्या शिबिरामध्ये सामील झाल्यानंतर किंवा स्पर्धेदरम्यान जायबंदी झाल्यास, सामान्यतः फ्रँचायझीकडून भरपाई दिली जाते. सहसा विम्यातून ५० टक्क्यांपर्यंतची रक्कम मिळते. भारताच्या केंद्रीय कराराबद्ध खेळाडूंना 'बीसीसीआय'कडून अधिक चांगली भरपाई मिळते," असे 'आयपीएल'शी संबंधित एका सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले. मुस्तफिझूरचे प्रकरण मानक विमा अटींमध्ये बसत नाही. दुखापत किंवा क्रिकेटशी संबंधित कारणामुळे तो लीगमधून दूर झालेला नाही. यामागे क्रिकेटेतर कारण आहे. त्यामुळे कोलकाता संघाला त्याला भरपाई देण्याचे बंधन नाही. "कोलकाता संघावर त्याला भरपाई देण्याची अधिकृत जबाबदारी नाही. ही दुर्दैवी बाब असली, तरी मुस्तफिझूरकडे कायदेशीर मार्गाशिवाय फारसे पर्याय नाहीत. शिवाय 'आयपीएल' भारतीय कायद्याच्या कक्षेत येते. त्यामुळे कोणताही परदेशी खेळाडू असा खटला किंवा क्रीडा लवादाचा मार्ग पत्करू इच्छित नाही," असेही सूत्राने नमूद केले.बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) 'आयपीएल'मध्ये सहभागी होण्यासाठी मुस्तफिझूरला दिलेले 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) मागे घेतले असून, त्यामुळे त्याची बाजू आणखी कमकुवत झाली आहे.– सूत्रांच्या म्हणण्यानुसार, व्यापक भू-राजकीय पार्श्वभूमीही कायदेशीर कारवाईपासून परावृत्त करणारी आहे. भारत-बांगलादेश राजकीय समीकरण पुढे जाऊन सुधारू शकते. त्यामुळे आता 'बीसीसीआय'च्या विरोधात जाणे मुस्तफिझूरसाठी पुढे अडचणीचे ठरू शकेल. – त्याच्यासाठी 'आयपीएल'ची दारे कायमची बंद होऊ शकतील. त्यामुळे कोणताही शिस्तभंग किंवा व्यावसायिक दोष नसतानाही मुस्तफिझूरला सध्या रिकाम्या हाताने परत जावे लागण्याची चिन्हे आहेत.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर 'आयपीएल' संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला तरी त्याला कोणतीही क्रिकेटेतर कारणांनी हा निर्णय घेण्यात आल्याने मुस्तफिझूरला भरपाई देण्यास कोलकाता संघावर कोणतेही बंधन नाही.

### मुस्तफिझूरसाठी अडचण

मुस्तफिझूरसाठी ९.२० कोटी रुपयांची विजयी बोली लावली. मात्र, त्याला स्पर्धेत खेळण्यास मज्जाव करण्यात आला आहे. 'बीसीसीआय'ने मुस्तफिझूरला लीगमधून दूर करण्याचे कारण स्पष्ट केले नाही. 'सध्याची परिस्थिती' लक्षात घेता हे आदेश देण्यात आल्याचे 'बीसीसीआय'चे सचिव देवजित सैकित म्हणाले होते. काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदूविरोधात हिंसाचार वाढत असल्याने भारतातील काही राजकीय पक्षांनी दडपण आणल्यामुळेच 'बीसीसीआय'ने हे पाऊल उचलल्याची चर्चा आहे.

# न्यूझीलंडविरुद्ध रोहित सज्ज!

## पहिल्या वनडेआधी हिटमॅन रोहित शर्माचा कसून सराव

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका होणार आहे. वनडे मालिकेतील पहिला सामना येत्या ११ जानेवारीला वडोदरा येथे खेळवला जाणार आहे. या सामन्याआधी भारतीय खेळाडू ६ किंवा ७ जानेवारीला एकत्र येणार आहेत.**



दरम्यान भारताचा स्टार फलंदाज रोहित शर्माने पहिल्या वनडे सामन्यासाठी रवाना होण्यापूर्वी मुंबईतील बीकेसीत फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाचा कसून सराव केला,ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियाव व्हायरल होत आहे.रोहित शर्माने २०२४ टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामना जिंकल्यानंतर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावर जाण्याआधी त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यामुळे तो केवळ वनडे क्रिकेटमध्ये सक्रिय आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी तो दादरच्या शिवाजी पार्कात फलंदाजीचा सराव करताना दिसून आला होता. त्यानंतर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरूद्ध खेळताना त्याने धावांचा पाऊस पाडला होता. आता न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या मालिकेसाठी देखील त्याने कसून सराव केला आहे.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता, रोहित नेट्समध्ये फलंदाजीचा सराव करताना दिसून येत आहे. टी दिलीपदेखील रोहितसोबत असल्याचं दिसून येत आहे. यासह रोहितचा आणखी एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे, ज्यात रोहित स्लीपमध्ये झेल घेण्याचा सराव करताना दिसून येत आहे.

### इतिहासाला गवसणी

रोहित २०२७ वर्ल्डकप स्पर्धेसाठी सराव करत आहे. एकच फॉरमॅट खेळत असल्याने रोहितला फार सामने खेळण्याची संधी मिळणार नाही.रोहितने २०२५ मध्ये अनेक मोठे रेकॉर्ड्स आपल्या नावावर केले. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यादरम्यान रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०,००० धावा पूर्ण करण्याचा पल्ला गाठला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 7 जानेवारी 2026

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मोशीतील प्रियदर्शनी स्कूलचा

# राष्ट्रीय स्तरावरील भारत प्रतिभा सन्मान!

### शिक्षण विश्व : राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत शिक्षण क्षेत्रात वेगळा ठसा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. एनडीएमसी, नवी दिल्ली येथे आयोजित भव्य समारंभात शाळेला "भारत प्रतिभा सन्मान २०२६" या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.**




हा सन्मान शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, सर्वांगीण विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल म्हणून प्रदान करण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच चारित्र्यनिर्माण व राष्ट्रनिर्माणाची जबाबदारी जपणारी शाळा म्हणून प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांची राष्ट्रीय स्तरावर ओळख अधिक दृढ झाली आहे.

या यशामागे शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच पालकांचे सहकार्य व समर्पण मोलाचे ठरले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या गौरवामुळे जबाबदार, आत्मविश्वासी आणि सक्षम भावी नागरिक घडवण्याच्या शाळेच्या ध्येयाला नवी ऊर्जा मिळाली आहे. प्रियदर्शनी स्कूल, मोशी ही संस्था भविष्यातही उच्च शैक्षणिक मानदंड, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि सर्वांगीण विकास यांचा समतोल साधत समाजासाठी आदर्श घडविण्यास कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## प्रभाग क्रमांक 2 मध्ये भाजपाच्या 'रोड शो'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मिशन- PCMC : प्रभाग 2 मध्ये विकासाचा नवा अध्याय सुरू करण्याचा संकल्प

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ (कुदळवाडी–जाधववाडी–बोऱ्हाडेवाडी–मोशी) येथे भारतीय जनता पार्टीतर्फे भव्य पदयात्रा व रॅलीचे आयोजन करण्यात आले. हिंदुत्ववादी आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता ही पदयात्रा पार पडली.**



"प्रभाग क्रमांक २ मधील मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी आणि चिखली परिसराचा सर्वांगीण, संतुलित आणि शाश्वत विकास हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक व लोकाभिमुख कारभार केला जाईल. नागरिकांनी 'चारही मते भाजपला' देऊन संधी दिल्यास, प्रभाग क्रमांक २ मध्ये विकासाचा नवा अध्याय निश्चितपणे सुरू होईल,"
— **राहुल जाधव,** माजी महापौर व उमेदवार, भाजपा, प्रभाग क्रमांक २.

वूडसविले फेज टू, लक्ष्मी चौक येथून सुरू झालेली पदयात्रा स्वराज रेसिडेन्सी ते प्रेस्टिंग ग्रीन सोसायटी फेज १, २ व ३ मार्गे स्वदेशा सोसायटी, श्रीराम चौक आणि रिव्हर परिसरातून मार्गक्रमण करत पुढे सरकली. मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी व चिखली परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यावेळी पाहायला मिळाला.

प्रचारादरम्यान प्रभागातील विकासकामांचा आढावा घेत "प्रभाग क्रमांक २ मध्ये आता फक्त कमळच" आणि "प्रभाग २ च्या प्रगतीला चारही मते भाजपला" अशा घोषणा देण्यात आल्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'बलशाली भारत आणि विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेनुसार शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. भाजपाकडून प्रभाग क्रमांक २ मध्ये सुजाता निलेश बोराटे (अ – ओबीसी महिला), सारिका नितीन बोऱ्हाडे (ब – सर्वसाधारण महिला), राहुल गुलाब जाधव (क – सर्वसाधारण) आणि निखिल शिवाजी बोऱ्हाडे (ड – सर्वसाधारण) हे अधिकृत उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. समाविष्ट गावांचा सर्वांगीण विकास, पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण तसेच महिला व युवक सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याची भूमिका उमेदवारांनी मांडली. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांचे प्रचार कार्यक्रम वेग घेत असून प्रभाग क्रमांक २ मध्ये राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे.

## अहिल्यादेवी सेवा संघातर्फे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, नवी सांगवी,

# भाजपचे विकासाचे व्हिजन मान्य!

### अहिल्यादेवी सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांचा विश्वास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या निमित्ताने प्रभाग क्रमांक 31 मधील भाजपच्या सर्व उमेदवारांना अहिल्यादेवी सेवा संघातर्फे जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला.**

सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून प्रभाग क्रमांक 29 मधील उमेदवार रवीना अंघोळकर, शकुंतला धराडे, शशिकांत कदम, शांताराम जगताप, प्रभाग क्रमांक 31 मधील दुर्गाकौर अदियाल, ज्ञानेश्वर जगताप, पल्लवी जगताप व नवनाथ जगताप आणि प्रभाग 32 मधील तृप्ती कांबळे, हर्षल ढोरे, उषाताई ढोरे, प्रशांत शितोळे या उमेदवारांनी प्रभागाच्या विकासाचा नारा दिला.यावेळी अहिल्यादेवी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून 2017 नंतर शहरांमध्ये विकासाची गंगा आली आहे. पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, नवी सांगवी, सांगवी या परिसरामध्ये भाजपच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली. स्मार्ट सिटी अंतर्गत या भागाचा समावेश झाल्याने नागरिकांना अत्याधुनिक सेवा सुविधा मिळाल्या. आगामी काळात या भागातून निगडी ते चाकण पर्यंत जाणारी मेट्रो देखील येणार आहे. त्यामुळे भाजपाच्या माध्यमातून परिसराचा विकास होईल हा विश्वास आहे. म्हणूनच भाजपाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला असल्याचे अहिल्यादेवी सेवा संघाने स्पष्ट केले आहे.

## प्रचाराच्या रणधुमाळीत विराज लांडे यांचा वाढदिवस उत्साहात

### प्रभाग 7 मधील युवक, ज्येष्ठ, माता-भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



जनतेसोबत वाढदिवस साजरा करत विकासाचा निर्धार

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सध्या शिगेला पोहोचली असून प्रभाग क्रमांक ७ सँडविक कॉलनी, खंडोबामाळ, लांडेवाडी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विराज विश्वनाथ लांडे यांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली आहे.**

प्रचाराच्या या धामधुमीत सोमवारी (दि. ५ जानेवारी) विराज लांडे यांनी आपला वाढदिवस थेट प्रभागातील मतदारांसोबत साजरा करत जनतेशी आपली नाळ अधिक घट्ट केली.

शांतीनगर, लांडेवाडी, गव्हाणे वस्ती, आदिनाथ नगर, खंडोबामाळ, डोळसवाडा आदी ठिकाणी घरोघरी, सोसायटी मधील नागरिकांसह संपूर्ण प्रभाग ७ मधील नागरिक, युवक, ज्येष्ठ, माता-भगिनी यांनी वाढदिवसानिमित्त विराज लांडे यांच्यावर शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव केला. फुलहार, मिठाई, शुभेच्छा देत नागरिकांनी त्यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शविला. 'आमचा उमेदवार, आमचा प्रतिनिधी' अशा भावना नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होत्या. सध्या प्रभाग ७ मध्ये विराज लांडे यांच्या वतीने पदयात्रा, होम टू होम गाठीभेटी, कोपरा सभा, तसेच थेट नागरिकांशी संवाद साधत प्रचाराला वेग आला आहे. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक यांच्या सक्रिय सहभागामुळे प्रचाराला चांगलीच ऊर्जा मिळत असून, त्याच उत्साहात हा वाढदिवसही साजरा करण्यात आला.प्रचाराच्या रणधुमाळीत जनतेसोबत वाढदिवस साजरा करत विराज लांडे यांनी विकास, संवाद आणि विश्वास यावर आधारित राजकारणाचा संदेश दिला असून,

> प्रभागातील पाणी, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य, स्वच्छता आदी नागरी समस्यांची शासन दरबारी प्रभावीपणे सोडवणूक करण्याचा ठाम निश्चय आहे असा विश्वास नागरिकांना दिला. वाढदिवसाचा खरा आनंद जनतेच्या आशीर्वादातच आहे. प्रभागातील प्रत्येक प्रश्नासाठी मी सदैव रस्त्यावर उतरणार आहे.
>
> **—विराज विश्वनाथ लांडे,**
> उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, प्रभाग क्रमांक ७.

प्रभाग ७ मध्ये त्यांच्या प्रचाराला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### निवडणूक प्रमुख, आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

# शहरातील प्रत्येक घराचे मोफत "ड्रोन मॅपिंग"!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ; प्राधिकरणबाधित नागरिकांना मिळणार "प्रॉपर्टी कार्ड"




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड प्राधिकरण क्षेत्रातील बांधकाम व मिळकतींच्या मालकी हक्क प्रमाणपत्राचे (प्रॉपर्टी कार्ड) महापालिका निवडणुकीनंतर वाटप करण्यात येईल असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी सांगितले. याशिवाय शहरातील प्रत्येक घराचे ड्रोन मॅपिंग केले जाणार आहे. प्रत्येक प्लॉटवरील प्रत्येक घराचा सरकारी नकाशा गुगल क्लाऊडवर दिला जाणार आहे, ज्या माध्यमातून थेट आपल्या मोबाईलमध्ये आपल्या नकाशा दिसणार आहे. पाचशे वर्षानंतरही आपले घर आपल्याला गुगलवर दिसेल. ही सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे असे देखील बावनकुळे म्हणाले.**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या निमित्ताने प्रभाग 17, 23 आणि 24 येथील उमेदवारांसाठी वाल्हेकरवाडी आणि थेरगाव येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप उपस्थित होते. दरम्यान सभेसाठी प्रभाग 17 मधील आशा सूर्यवंशी, नामदेव ढोके, पल्लवी वाल्हेकर, सचिन चिंचवडे तर प्रभाग 23 मधील मनीषा प्रमोद पवार, तानाजी बारणे, सोनाली गाडे, अभिषेक बारणे आणि प्रभाग 24 मधील उमेदवार सिद्धेश्वर बारणे, करिष्मा बारणे, गणेश गुजर आणि शालिनी गुजर हे उमेदवार उपस्थित होते. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पिंपरी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेमध्ये प्रॉपर्टी कार्डचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर मी राज्यामध्ये तुकडा बंदी कायदा अंमलबजावणी केली . या कायद्यामुळे गुंठा, दीड गुंठा जागेमध्ये बांधलेल्या घरांची सरकार दरबारी नोंदणी करणे शक्य झाले. महापालिका निवडणुका झाल्यानंतर आपण आमदार शंकर जगताप यांनी मागणी केल्याप्रमाणे सर्व घरांचे प्रॉपर्टी कार्ड करून घेणार आहोत. मी स्वतः या प्रॉपर्टी कार्डचे वाटप करण्यासाठी शहरात येणार आहे. याशिवाय आपण येथील घरांचे ड्रोन मॅपिंग देखील करणार आहोत. येथील प्रत्येक घराचे ड्रोन मॅपिंग करून प्रत्येक प्लॉटचा सरकारी नकाशा आम्ही गुगल क्लाऊड वर देणार आहोत. ज्या माध्यमातून गुगलवर नाव टाकल्यानंतर घराचा नकाशा तुम्हाला उपलब्ध होणार आहे. यातून एक महत्त्वाचा सरकारी दस्तऐवज तयार होणार आहे. ज्याचा फायदा प्रत्येक नागरिकाला होणार आहे. सरकार विशेष बाब म्हणून या सर्व घरांचे ड्रोन मॅपिंग करून नागरिकांना मोफत प्रॉपर्टी कार्ड देणार आहे. त्यामुळे यापुढील काळात तहसीलदाराकडे चकरा मारावे लागणार नाही. याचा लाखो परिवाराला दिलासा मिळणार आहे. हे निर्णय होण्यासाठी येत्या 15 जानेवारी रोजी भाजपला आपले मतदान महत्त्वाचे आहे. असे देखील बावनकुळे म्हणाले.

यावेळी निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी 2017 पासून शहरांमध्ये भाजपच्या माध्यमातून झालेल्या प्रगतीचा आलेख महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर मांडला. आगामी काळातही पिंपरी चिंचवड महापालिकेला प्रगतीच्या मार्गावर कायम ठेवण्यासाठी भाजपच्या माध्यमातून "विकासाचे व्हिजन" साध्य करायचे आहे. त्यामुळे भाजपच्या उमेदवारांना 15 जानेवारी रोजी मतांच्या रूपाने पाठिंबा द्यावा असे आवाहन देखील त्यांनी नागरिकांना केले

### बचत गटांना मिळणार लाखाचे अनुदान

नागपूरमध्ये जशी महिला बचत गटांना अनुदान योजना उपलब्ध करून दिली गेली. त्याच प्रमाणे पिंपरी-चिंचवडमध्येही अनुदान योजना राबवण्यात येणार आहे असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी सांगितले. निवडून आल्यावर शहरातील महिला बचत गटांना प्रत्येकी 1 लाख रुपये अनुदान प्रदान केले जाईल. मुख्य म्हणजे लाडकी बहीण योजना भाजपचे सरकार असेपर्यंत सुरू ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे देखील बावनकुळे यावेळी म्हणाले.

# जिल्हा कराटे स्पर्धेत एफ.ई. विद्यार्थिनीचे घवघवीत यश

## शिक्षण विश्व: उन्नती फडतरे हिची जिल्हा कराटे स्पर्धेत कामगिरी




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वराळे-तळेगाव : डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, वराळे-तळेगाव, पुणे येथील प्रथम वर्ष अभियांत्रिकी (एफ.ई.) मधील विद्यार्थिनी कु. उन्नती फडतरे हिने जिल्हा कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे.**

या स्पर्धेत उन्नतीने आपल्या उत्कृष्ट कौशल्य, शिस्तबद्ध सराव आणि जिद्दीच्या जोरावर अंडर-२१ वर्षे महिला कुमिते तसेच सिनिअर महिला कुमिते या दोन गटांत सुवर्णपदकांची कमाई केली. तिच्या या घवघवीत यशामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी परंपरेला आणखी बळ मिळाले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर कु. उन्नती फडतरेची २०२६ साली नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही बाब संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे मा. डॉ. सुशांत पाटील व मा. अॅड. अनुजा पाटील यांनी उन्नतीचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्य डॉ. सुरेश शिरभदुरकर, डीन अकॅडेमिक्स डॉ. योगेश गुरव, रजिस्ट्रार श्री. वेटाळे आणि सर्व विभागप्रमुखांनीही तिच्या कामगिरीचे कौतुक केले.

डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस परिवाराकडून कु. उन्नती फडतरेला भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत असून, ती राज्य व राष्ट्रीय स्तरावर अधिक यश संपादन करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### महिला सक्षमीकरण, स्थानिक विकासाचा नारा; शिवसेना (धनुष्यबाण) पॅनेलची प्रचारात मोठी आघाडी

# नवी सांगवीत 'धनुष्यबाणाची' गर्जना!

## स्थानिक उमेदवारांच्या पाठीशी मतदारांचा खंबीर निर्धार!



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा धुरळा उडाला असून, नवी सांगवी प्रभाग क्रमांक ३१ मध्ये शिवसेनेच्या (धनुष्यबाण) उमेदवारांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली आहे. "नवी सांगवीचा एकच निर्धार, नवी सांगवीचाच उमेदवार" अशा घोषणांनी संपूर्ण प्रभाग दणाणून गेला असून, स्थानिक उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

**घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद**

शिवसेना पॅनेलच्या चारही उमेदवारांनी प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी घेण्यावर भर दिला आहे. "आम्ही जरी निवडणूक पहिल्यांदा लढवत असलो, तरी याच मातीतील स्थानिक रहिवासी आहोत. नगरसेवक पद नसतानाही गेली नऊ वर्षे आम्ही जनसेवेची कामे केली आहेत, त्याची पोचपावती जनता आम्हाला नक्कीच देईल," असा ठाम विश्वास उमेदवारांनी यावेळी व्यक्त केला. २४ तास उपलब्ध असणारा लोकप्रतिनिधी हवा, या भावनेतून नागरिकांनीही उमेदवारांना आशीर्वाद दिले. महिलांच्या हाताला काम; बचत गटांचे सक्षमीकरण प्रचारादरम्यान महिलांशी संवाद साधताना महिला उमेदवारांनी रोजगारावर विशेष भर दिला. "महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी आम्ही बचत गटांच्या माध्यमातून घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देऊ. प्रभागात ठिकठिकाणी सेमिनार आयोजित करून महिलांच्या हाताला काम मिळवून देणे आणि त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, हे आमचे मुख्य ध्येय आहे," असे मत महिला उमेदवारांनी व्यक्त केले. तरुणांचा जल्लोष आणि ज्येष्ठांचा आशीर्वाद प्रचार फेरीमध्ये तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. तरुणांनी दाखवलेला उत्साह आणि ज्येष्ठ नागरिकांनी दिलेला पाठिंबा पाहून उमेदवार भारावून गेले होते. आचारसंहितेचे पूर्ण पालन करत ठिकठिकाणी कोपरा सभा घेऊन उमेदवारांनी आपला विकास आराखडा मतदारांसमोर मांडला. "हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला असून, यंदाही येथे भगवाच फडकणार," असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

शिवसेना (धनुष्यबाण) पॅनेलचे अधिकृत उमेदवार:
(अ) मनिषा आश्विन खुडे (अनुसूचित जाती)
(ब) प्रशांत बबनराव कडलग (नागरिकांचा मागासवर्ग)
(क) आरती संभाजी भेगडे (सर्वसाधारण महिला)
(ड) मेघराजराजे सिध्दार्थ लोखंडे (सर्वसाधारण)

मतदारांना आवाहन प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विश्वासासाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत 'धनुष्यबाण' या चिन्हासमोरील बटन दाबून शिवसेनेच्या चारही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन पॅनेलच्या वतीने करण्यात आले आहे.

**बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची ग्वाही**
स्थानिक समस्या सोडवण्यासाठी ठोस कृती आराखडा.
२४ तास उपलब्ध राहणारा स्थानिक लोकप्रतिनिधी देण्याचा संकल्प.

# प्रभाग ५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) प्रचारात झंझावात

## 'गावभेट' दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण तापू लागले असून, प्रभाग क्रमांक ५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे.**

शहराध्यक्ष अजितभाऊ गव्हाणे यांच्या नेतृत्वाखालील या प्रभागातील चारही उमेदवारांनी आज 'गावभेट' आणि 'सोसायटी संपर्क' अभियानावर भर देत प्रचाराचा धडाका उडवून दिला. स्थानिक उमेदवारांच्या बाजूने मतदारांचा कौल प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रियंका बारसे, भीमाताई फुगे (काकी), अमर फुगे आणि राहुल गवळी हे सर्व स्थानिक उमेदवार असल्याने त्यांना मतदारांकडून मोठे प्रेम मिळत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग आणि जनतेशी असलेल्या अतूट नात्यामुळे या उमेदवारांचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे. सत्ता नसतानाही 'लोकसेवक' म्हणून कार्याचा धडाका "नगरसेवक नसलो तरी लोकसेवक म्हणून काम करणे आम्ही कधीच थांबवले नाही," ही भावना या उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचवली आहे. सत्ता हातात नसतानाही प्रभागातील प्रलंबित प्रश्न स्वबळावर आणि सामाजिक उपक्रमांतून मार्गी लावल्याने नागरिकांमध्ये या उमेदवारांबद्दल आदराची भावना आहे. २४ तास जनतेसाठी उपलब्ध राहणाऱ्या या चौकडीला "आपले हक्काचे लोक" म्हणून जनता स्वीकारताना दिसत आहे.

घरोघरी जाऊन 'घड्याळा'चा प्रचार आज प्रभागातील सर्व सोसायट्या आणि गावठाण भागात पदयात्रा काढण्यात आली. यावेळी उमेदवारांनी मतदारांना आवाहन केले की, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शहराच्या विकासासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी संपूर्ण पॅनलला निवडून देणे गरजेचे आहे. "अजितदादांनी दिलेला विकासाचा शब्द आम्हाला पाळायचा आहे. गेल्या नऊ वर्षांपासून आम्ही प्रभागातील सुख-दु:खात सहभागी आहोत. म्हणूनच, केवळ निवडणूक म्हणून नाही तर हक्काचे आशीर्वाद घेण्यासाठी आम्ही जनतेच्या दारात आलो आहोत." — प्रभागातील उमेदवारांची सामूहिक भावना

### गावभेट' दौऱ्यावर विशेष भर

आजच्या प्रचाराचे मुख्य आकर्षण म्हणजे 'गावभेट' कार्यक्रम. जुन्या गावठाण भागातील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून स्वागत केले. "आमची कामे करणारा माणूस आम्हाला हवा आहे," अशा शब्दांत स्थानिकांनी आपला पाठिंबा व्यक्त केला. 'एकच वादा, अजित दादा' आणि 'घड्याळा'च्या जयघोषाने प्रभाग क्रमांक ५ दणाणून गेला होता.